# गुरुपौर्णिमा

आषाढ पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा असे म्हणतात. या दिवशी व्यासपूजा करण्याची प्रथा आहे. महर्षि व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार आहेत. संस्कृतीची मूळ संकल्पना आणि पुढची जोपासना व्यासांनीच केली. त्यांनी वेदांचे नीटपणे विभाजन आणि संपादन केले. पूर्वी वेद एकच होता, त्याचे चार भाग व्यासांनी केले. त्यांनी महाभारत लिहीले. हा ग्रंथ जगातील अलौकीक व सर्वश्रेष्ठ ठरला कारण या ग्रंथात धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, व्यवहार शास्त्र आणि मानसशास्त्रही आहे.

गुरु या शब्दाचा अर्थच मोठा-महान असा आहे. शिष्याने तो मान्य केल्यावरच तो काहीतरी शिकू शकतो. म्हणूनच "गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरः । गुरुः साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः" असे म्हणून त्यांना देवतुल्य मानले आहे.

संत कबीर म्हणतात 'गुरु गोविंद दोऊ खडे काके लागो पाय । बलिहारी गुरु आपने गोविंद दीजो बताय ।' म्हणजे त्यांनी तर देवाच्याही आधी गुरुच्या पायावर डोके ठेवणे पसंत केले आहे.

परीस हा लोखंडाला स्पर्श करुन त्याचे फक्त सोने बनवतो; पण गुरु तर थेट शिष्याला आपल्यासारखे बनवतो; म्हणून तोच जास्त श्रेष्ठ. भगवान श्रीकृष्णाने गुरुच्या घरी लाकडे वाहीली, संत ज्ञानेश्वरांनी आपल्या वडील बंधूस निवृत्तीनाथास गुरु मानले; तर संत नामदेव प्रत्यक्ष विठ्ठलाशीच भाष्य करत. त्यांचे गुरु होते विसोबा खेचर.

गुरु पौर्णिमा ही सद्गुरुची मानली जाते. पौर्णिमा म्हणजे प्रकाश! गुरु ज्ञानाचा सागर असल्यामुळे त्यांच्याकडून नम्र होऊनच ज्ञान घ्यावे लागते.

श्री दत्तात्रेयांनी २१ गुरु केले; ज्यांच्यापासून काहीतरी नवीन-चांगले शिकायला मिळते अशी व्यक्ती गुरु!! त्यांच्या जवळ असलेला ज्ञानाचा प्रकाश आपल्या पर्यंत पोहचावा; म्हणून प्रार्थना करण्याचा आजचा हा दिवस "गुरु पौर्णिमा"!!

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.

**व्हिडिओ पहा**